# ILS LAW COLLEGE, PUNE – 411004

**PM Yasasvi Central Sector Scheme Of Top Class Education In College For**

# OBC, EBC And DNT Students-2025-26

भारत सरकार द्वारे सुरु केलेल्या “**Pm Yasasvi Central Sector Scheme Of Top Class Education In College For OBC, EBC And DNT Students**” या शिष्यवृत्तीकरीता आय्.एल्.एस् विधी महाविद्यालयाची निवड करण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून गूगल फॉर्मद्वारा अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व अर्जदार विद्यार्थ्यांची माहिती संकलित करून गुणवत्तेच्या आधारे या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. विद्यार्थ्याने पात्रता परीक्षेत (MH - CET) मिळवलेल्या गुणांच्या आधारावर ही निवड केली जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेचा अंतिम निर्णय शासनस्तरावर घेण्यात येईल.

**किमान पात्रता व अटी -**

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असावे.
४. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, विधी एलएल.बी. (५ वर्ष) आणि बीबीए एलएल.बी. (५ वर्ष) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत व विधी एलएल.बी. (३ वर्ष) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ३ वर्षापर्यंत देय राहील.

**गूगल फॉर्म ची लिंक**

**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfMCYLrx9ZVSBR5gwE0Ub1mssNE35GaDbZHuNWxWLpZDtnyaw/viewform?vc=0&c=0&w=1&flr=0&pli=1**

**फॉर्म सोबत खालील कागदपत्रे अपलोड करावीत: -**

1. सी ई टी स्कोर कार्ड (CET Score Card)
2. कॉलेज फी पावती
3. उत्पन्नाचा दाखला (वर्ष २०२४-२५साठीचाआणि ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेला) (Original)
4. जात प्रमाणपत्र (स्व-साक्षांकित प्रत)
5. जात वैधता प्रमाणपत्र (स्व-साक्षांकित प्रत)
6. नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र(३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेला)
7. दहावी गुणपत्रिका(मार्कशीट)
8. बारावी गुणपत्रिका(मार्कशीट)
9. पदवी गुणपत्रिका(मार्कशीट) (फक्त एल एल बी विद्यार्थ्यासाठी)
10. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र (EWS Certificate)

**या योजनेसाठी २७ (OBC Slot) आणि २ (EBC Slot) विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्या आधारावर निवड करण्यात येईल**. सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी गूगल फॉर्मद्वारे आपली माहिती २९ऑक्टोबर २०२५ पूर्वी सादर करावी. उशिरा आलेले किंवा अर्धवट भरलेले अर्ज शिष्यवृत्ती साठी विचारात घेतले जाणार नाहीत. अधिक माहितीसाठी काउंटर नंबर १ वर सोनाली निवंगुणे यांच्याकडे संपर्क साधावा.

डॉ. दीपा पातुरकर
प्राध्यापक आणि प्रभारी प्राचार्य;
आय्.एल्.एस्.विधी महाविद्यालय, पुणे